DAYANAND ANGLO VEDIC PUBLIC SCHOOL, AIROLI
FIRST TERM SAMPLE QUESTION PAPER 2024-25
SUBJECT - MARATHI (009)

STD- X MAX.MKS.- 80 TIME - 3 HRS.

---

सर्वसाधारण सूचना -

1) या प्रश्नपत्रिकेत अ, ब , क, ड असे चार विभाग आहेत.
2) सर्व विभाग आवश्यक आहेत.
3) यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच सोडवावीत.

---

विभाग - अ (वाचन व आकलन - 15 गुण)

प्र, 1 खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

भारतीय राज्यघटनेने आपल्या देशात लोकशाही आली. पण लोकशाहीची मधुर फळे आपण चाखतो? कोणाही विचारी माणसास याचे नकारार्थी उत्तर द्यावी लागेल. नुसत्या नकाराने हा प्रश्न सुटणार नाही. त्याच्या मुळाशी असणाऱ्या कारणांचा विचार करण्यास हवा.

वर्णव्यवस्थेच्या जाचक रूढींनी समाज पोखरला. त्यामुळे परस्परांबद्दल आपुलकी ठरली नाही अस्पृश्यतेची विषारी मुळे समाजाच्या मनावर खोलवर रुजली आहेत. याबद्दल सभा,आंदोलने गाजतात पण व्यवहारीक आचरण मात्र शून्य

आज अशी अनेक खेडी आहेत की तिथपर्यंत ही शिक्षणाची गंगा आजवर पोहोचली नाही. ती जगापासून कितीतरी दूर आहे अज्ञान आणि दारिद्र्याच्या विळख्यात जखडलेली आहे. म्हणूनच मी म्हणतो की, लोकशाहीच्या यशासाठी समतेचा ध्वज उंच धरा. शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करा. स्वार्थी धर्मकल्पनांचे जोखड झुगारून द्या. त्यासाठी विवेक बुद्धी जागृत ठेवा.

प्र 1a) खालील उतारा वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय मधून निवडा.3M
(कोणतीही तीन)

i) लोकशाहीची _________ फळे आपण चाखतो.
( कडू / गोड / मधुर / आंबट )

ii) आपल्याला परस्परांबद्दल_____________ ठरली नाही.
( आदर / आपुलकी / अनादर / भीती )

iii) त्यासाठी___________ जागृत ठेवा.
( विवेकबुद्धी / नम्रता / आपुलकी / माणुसकी

iv) _____________ सर्वत्र प्रसार करा.
( शिक्षणाचा / ज्ञानाचा / राज्यघटनेचा / खेड्यांचा )

प्र 1b) खालील प्रश्नांची उत्तरे उत्तराच्या आधारे एका वाक्यात लिहा (कोणतेही तीन) 3M

i) आपल्या देशातलोकशाही कशी आली?
ii) आपला समाज कशाने पोखरला आहे?
iii) शिक्षणाची गंगा कोठे अजून पोहोचली नाही ?
iv) खेडी कशात जखडली आहेत?

प्र 1c) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही एक) 2M

i) वर्णव्यवस्थेचा समाजावर काय परिणाम झाला आहे?
ii) लेखक लोकशाहीच्या यशासाठी समतेचा ध्वज उंच धरा असे म्हणण्यामागचे कारण काय असेल?

प्र 2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

माझं सौंदर्य कधी पाहिलंच नसेल
माझ्या अनुभव कधी घेतलाच नसेल
माझ्या कुशीत कधी येऊन पहा
कधी मलाही तुम्ही जवळून पहा

डोंगराची वस्ती माझ्यातच आहे
झाडे-वेलींची गर्दी माझ्यातच आहे
नद्या, नाले, ओढे, धुंद ती हवा
कधी माझ्या अंगणात येऊन पहा
रिमझिम पावसात भिजून जा
कधी गडद धुक्यात न्हावून जा
लांब पारंब्यावर झुलत रहा
कधी झऱ्यातून चालून पहा
सुंदरता अजूनही माझ्यात आहे
बस तुमच्या मदतीला साथ आहे
आजही देईन तीच गार हवा
किमान एक झाड तरी लावून पहा….
किमान एक झाड तरी लावून पहा…..

प्र 2 a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा (कोणतेही तीन)3M

i) वरील कविता कशावर आधारित आहे?
( अर्थावर / समाजावर / गणितावर / निसर्गावर)

ii) सुंदर या शब्दासाठी कवितेत आलेला भाववाचक शब्द कोणता?
( अनुभव / सौंदर्य / कुशीत / पारंब्या)

iii) गर्दी कोणाची झाली आहे?
( झाडे - वेलींची / पाना -फुलांची / दगड- धोंड्यांची / नद्या-नाल्यांची)

iv) कवी कोठे बोलवत आहे ?
( घरात / दारात / अंगणात / बाजारात)

प्र 2 b) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार ) 4M

i) कवी कुठे भिजायला सांगतो आहे ?
ii) कवी पारंब्यावर काय करायला सांगत आहे?
iii) धुंद कोण झाली आहे ?
iv) कवीने आपल्याला काय करायला सांगितले आहे?
v) गार हवा कोण देणार आहे ?

## विभाग ब - (व्याकरण 20 गुण)

प्र 3 a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही चार) 4M

i) खालीलपैकी भाववाचक नामाचा योग्य पर्याय कोणता?
( विश्वास / राम / गंगा / लाल )

ii) खालीलपैकी योग्य विधाने कोणती?
a) नाम म्हणजे नामाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द.
b) नाम म्हणजे नामा ऐवजी वापरला जाणारा शब्द.
c) नाम म्हणजे वस्तू किंवा पदार्थाचे नाव होय.
d) नाम म्हणजे वाक्याचा अर्थ सांगणारा शब्द.
A) विधान a बरोबर B) विधान d बरोबर
C) विधान c बरोबर D) विधान b बरोबर

iii) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते?
a) देशासाठी वीरांनी प्राणार्पण केले.
b) गावाबाहेर जत्रा भरली.
c) कासव हळू चालतो.
d) सूर्य ढगामागे लपतो.

iv) खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय वापरा.
मला थोडे बरे नाही_____ सर्व ठीक.
( आणि / किंवा / बाकी / की

v) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा. - ती ‘सरसर’ पोहते.

प्र 3 b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही तीन ) 3M
i) तुम्ही चांगल्या गुणांनी पास व्हाल. - काळ ओळखा.
ii) राम गाणे गात असेल.- भूतकाळी वाक्य तयार करा.
iii) पृथ्वी सूर्याभोवती फिरते. - भविष्यकाळी वाक्य बनवा.
iv) माणसाने समान सेवा करावी.- वर्तमानकाळी वाक्य बनवा.

प्र 3 c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) 3M
i) मुलांच्या अभ्यासाची काळजी करायला नको का? - विधानार्थी वाक्य बनवा.
ii) नीता जबाबदार मुलगी आहे. - नकारार्थी वाक्य बनवा.
iii) सकाळी लवकर उठा. - वाक्याचा प्रकार ओळखा.
iv) निसर्गाला कुठलाही धर्म नाही. - प्रश्नार्थी वाक्य बनवा.

प्र 3 d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) 2M
i) खालीलपैकी एकवचनी शब्द कोणता ते ओळखा.
( कागद / वाट / दिवस / पुरुष )
ii) 'मुलगी' गाणे गाऊ लागली. अधोरेखित शब्दांच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा.
iii) 'तारीख' या शब्दाचा अनेकवचनी शब्द कोणता ?

प्र 4 a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.(कोणतेही दोन) 2M
i) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.
( कोल्हा / माकड / बैल / गाय)
ii) लिंग वचनानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.
( पगडी / फेटा / टोप / मुकुट )
iii) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता?
( झरा / नदी / समुद्र / धबधबा )

प्र 4 b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) 2M
i) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी लिहा.
( शेत = शिवार / नदी = पाणी / पाय =पर्ण / राणी = रान )
ii) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ते लिहा.
( चंद्र / रवी / शशी / हिमांशू )
iii) पुढीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
( तोंड / सोंड / वदन / मुख )

प्र 4 c) सूचनेप्रमाणे उत्तर लिहा. (कोणतेही दोन) 2M
i) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी लिहा.
ii) 'उजेड' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता?
( दिवस / दिन / अंधार / रात्र )
iii) 'स्वतंत्र' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?
( मुक्त / बंदिस्त / पारतंत्र्य / परतंत्र )

प्र 4 d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) 2M
i) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?
( प्रतिदिन / पदोपदी / खरेखोटे / क्षणोक्षणी )
ii) 'चहापाणी' या शब्दाचा समास ओळखा.
( वैकल्पिक द्वंद्व समास / द्विगु समास / समाहार समास / अव्ययीभाव समास)
iii) ____ या समासात सामासिक शब्दातील पहिले पद नेहमी संख्यावाचक असते.
( इतरेतर समास / द्विगु समास / अव्ययीभाव समास / समाहार समास )

विभाग क - (पाठ्यपुस्तक आधारित 30 गुण )

प्र 5 a) एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही तीन) 3M
i) शालीन कवी कोणास म्हटले आहे?
ii) पंतांनी कोणती भीष्मप्रतिज्ञा केली?
iii) लेखक ज्या शाळेत शिकला त्या शाळेचे नाव काय?
iv) तपोवन आतील स्त्रियांना अब्दुल कशासारखा वाटायचा ?

v) तपोवनात कोणाची वस्ती होती?

प्र 5 b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.( कोणतेही तीन)3M

i) पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी______ प्रसंग आला.
( उपासाचा / कठीण / व्रतभंगाचा / अवघड)

ii) अब्दुल ______ आला तेव्हा कार्यक्रम सुरू झाला होता.
( आश्रमात / तपोवनात / घरात / दारात)

iii) आमचे मूळ गाव__________ माशेल.
( पूर्व गोव्यातील / पश्चिम गोव्यातील / उत्तर गोव्यातील / दक्षिण गोव्यातील)

iv) _________रस मला अमृतासारखा वाटू लागला.
( उसाचा / लिंबाचा / संत्र्याचा / मोसंबीचा)

v) म्हातारा भिक्षेकरी पुलाच्या_______ बसला होता.
(कट्ट्यावर / मध्यावर / समोरच / वर )

प्र 5 c) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40 ते 50 शब्दात लिहा. 3M

i) 'भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा' या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

ii) अब्दुल हाच खरा समाजसेवक- या विधानातील सत्यता पटवून द्या.

iii) भिक्षेकऱ्याने शालीचा उपयोग कसा केला ?

प्र 5 d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमधील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.
(कोणतेही पाच)(मौन व्रत घेणे /आर्जव करणे / झोकून देणे / गलका करणे / सुरुंग लावणे / ताब्यात घेणे) 5M

i) मातृभूमीसाठी लढणारे जवान लढाईत स्वतःला पूर्णपणे सहभागी करतात.

ii) अचानक दिवे गेल्यामुळे मुले गोंगाट करू लागली.

iii) त्यांनी माझ्या घरी यावे म्हणून मी त्यांना खूप विनंती केली.

iv) पावसामुळे सर्व कार्यक्रम उधळून गेला.

v) महाराजांनी किल्ल्यावर कब्जा केला.

vi) रमेशने चूक केली म्हणून आईने त्याच्याशी न बोलण्याचे ठरवले.

प्र 6 a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) 4M

i) कवीची जिंदगी कशात बरबाद झाली ?

ii) कवीचा सर्वात जवळचा मित्र कोण?

iii) परमेश्वराचे दास कोणाला म्हटले आहे?

Iv) मेघाला विनवणी फोन करतो?

v) हंबरत कोण धावत जाते?

vi) कवीचे हात कोणाकडे गहाण राहिले आहेत?

प्र 6 b) खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्दांचा पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. 4M

i) अग्निमाजि पडे बाळू , माता धावे_______
( दयाळू / कनवाळू / प्रेमाळू / स्वप्नाळू)

ii) ______ विचार हरघडी केला, अगा जगमय झालो.
( जगाचा / विश्वाचा / दुनियेचा / माणसांचा)

iii) दोन दिवस_____ पाहण्यात गेले.
(रस्ता / दुःख / वाट / सुख)

iv) कधी माना उंचावलेले कधी______ झालेले पाहिले.
( उभारलेले / कलम / रोप / खाली)

प्र 6 c) खाली दिलेल्या काव्यपंक्तींचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.(कोणतेही एक) 3M

i) सवेची झेपावे पक्षिणी , पिली पडताचि धरणी ||

ii) झोतभट्टीत शेकावे पोलाद ,तसे आयुष्य छान शेकले ||

प्र 7 a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) 3M

i) बार्क संस्थेच्या नावाचे विस्तारित रूप लिहा.

ii) लेखक दुसऱ्याअनुभवातून कोणता धडा शिकले?

iii) डॉ. होमी भाभा यांनी भारतात कशाचा पाया घातला?

iv) बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाल्यानंतर लेखकाला कोणते काम करायला सांगितले होते?

प्र 7b) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40 ते 50 शब्दात लिहा. 2M

i) लेखक ट्रेनिंग स्कूलला असताना त्यांनी व त्यांच्या मित्रांनी होमी भाभांना कोणता प्रश्न विचारला ? त्यावर त्यांनी काय उत्तर दिले ?

ii) ‘स्काय इज द लिमिट’ ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते?

विभाग ड - ( लेखन 15 गुण)

प्र 8 a) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200- 250 शब्दात निबंध लिहा. 6M

i) मी क्रीडांगण बोलतोय -

मुद्दे - आनंदाने स्वागत क्रीडांगणाचे नवे रूप विविध खेळांचे आयोजन महत्व आजची स्थिती टीव्ही मोबाईलचा अतिवापर मनातील खंत केविलवाणी अवस्था मानवी जबाबदारी.

ii) वीज बंद पडली तर….

मुद्दे - विजेची गरज - महत्व - उद्योगधंदे - कारखाने - विजेची बचत - ऑफिसमध्ये विजेची आवश्यकता- वीज बंद पडल्यामुळे होणारे नुकसान - आपले कर्तव्य .

iii) आमच्या शाळेतील स्नेहसंमेलन -

मुद्दे - मुलांसाठी उत्साहाचा दिवस - एखाद्या विशिष्ट संकल्पनेवर आधारित - स्नेहसंमेलन - विविध गुणदर्शन- नाट्य, नृत्य, संगीत - विविध कलांचे सादरीकरण - मुलांचे उत्साहित चेहरे - पालकांना झालेला आनंद - विद्यार्थ्यांची सभा - धिटपणा - शिक्षक, मुख्याध्यापक, पालक या सर्वांकडून झालेले कौतुक - एक अविस्मरणीय प्रसंग.

प्र 8 b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक कथा लिहा. कथेला शीर्षक व तात्पर्य आवश्यक. 5M

i) मुद्दे - एक म्हातारा शेतकरी - चार मुलगे - सर्व आळशी - शेतकऱ्याला चिंता - मृत्यू समयी मुलांना जवळ बोलावणे - शेतात गाडलेली संपत्ती काढून घ्या - असे सांगणे - सर्व शेत खोदणे- काहीही न मिळणे - शेवटी विचार केला - शेत खोदले तर बी पेरावे - बियाणं पेरणे - चांगला पाऊस - उत्तम पीक - आनंदी आनंद- खूप पैसे - वडिलांच्या बोलण्याचा अर्थ समजणे - तात्पर्य.

ii) मुद्दे - टोप्या विकणारा - एका गावात येणे - दुपारची वेळ - एका झाडाखाली विश्रांती - टोप्यांची पेटी बाजूला ठेवून जेवण - जवळच नदी - पाणी पिणे - गुंगी येणे - झोपणे - उठल्यावरचे दृश्य- टोप्या गायब - झाडावर माकडे - माकडांच्या डोक्यावर टोप्या - मोठा प्रश्न - दगड फेकून मारणे- माकडांचे झाडावरील फळे फेकून मारणे - युक्ती लढविणे - स्वतःची टोपी जमिनीवर फेकणे - माकडे अनुकरण करतात - सर्व टोप्या खाली - टोप्या मिळाल्या - टोपी वाल्याचे निघून जाणे - तात्पर्य.

प्र 8 c) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. लिफाफा आवश्यक. 4 M

i) तुम्ही, लता / ललित लाड , सावरकर मार्ग, औंध, पुणे - 404 430 येथील रहिवासी असून, तुमच्या भागातील कचराकुंडीतील कचरा खूप दिवस झाले उचलला नाही. त्यामुळे सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे. यासंबंधीची तक्रार महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास करा.

ii) जान्हवी / जनार्दन जगनाडे, सरस्वती विद्यालय, रामपूर. येथून, शाळेच्या ग्रंथालय विभाग प्रमुख या नात्याने, शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र, आनंद पुस्तक भांडार, रानडे रोड, दादर(प) - 400014 च्या व्यवस्थापकास लिहा.

---